www.rajdand.com
सातारा मंगळवार
२०. २. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

# राजदंड

मराठी माणसाचा मानदंड
स्थापना १९९९
२५ वर्षे विश्वासार्हतेची

## महत्त्वाचे

### सोयाबीनचा भाव आठवडाभरापासून स्थिर

**लातूर:** सोयाबीन दरवाढीची अपेक्षा असलेल्या शेतकऱ्यांना अद्यापही प्रतीक्षाच आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीत आवक कमी- जास्त होत असली तरी आठवडाभरापासून सर्वसाधारण दर स्थिर आहे. बुधवारी ९ हजार ८९८ क्विंटल आवक होऊन सर्वसाधारण भाव ४ हजार ७१० रुपये प्रति क्विंटल असा मिळाला.-ऊत्एठ्ढखडएचएछ्ढदोन वर्षांपूर्वी सोयाबीनला ११ हजार रुपये प्रति क्विंटल असा सर्वोच्च भाव मिळाला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी सोयाबीनकडे विशेष लक्ष केंद्रित केले. खरीप हंगामाबरोबरच उन्हाळी सोयाबीन पीक घेण्यास सुरुवात केली. गत खरीपात विलंबाने पाऊस झाला. नगदी पीक म्हणून जवळपास साडेचार लाखापेक्षा अधिक हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनचा पेरा झाला होता.

त्यापाठोपाठ तुरीचा पेरा होता. दरम्यान, पावसाने ताण दिल्याने उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली.सोयाबीनची काढणी केल्यानंतर काही शेतकऱ्यांनी आर्थिक गरज भागविण्यासाठी विक्री केली.

विशेषत: दीपावली सणापूर्वी सोयाबीनला चांगला भाव होता. सरासरी ५ हजार १०० रुपये प्रति क्विंटल असा दर मिळत होता. सण झाल्यानंतर मात्र, दरात घसरण होण्यास सुरुवात झाली.

# मराठा आरक्षण किती टक्के?

## अधिवेशनाकडे साऱ्यांचे लक्ष; विधिमंडळात आज मांडणार विधेयक

**मुंबई :** मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी विधिमंडळाचे एक दिवसाचे विशेष अधिवेशन मंगळवारी होत असून, या अधिवेशनात मराठा आरक्षणाचे विधेयक मांडले जाणार आहे. या विधेयकावर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत चर्चा होऊन चर्चेअंती हे विधेयक मंजूर केले जाणार आहे. या विशेष अधिवेशनाची सुरुवात सकाळी ११ वाजता राज्यपालांच्या अभिभाषणाने होणार आहे. विधेयकात मराठा समाजाला नोकरीत १२ आणि शिक्षणात १३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांकडून मिळाली.मराठा आरक्षणासाठी मागील काही महिने राज्यात सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मराठा समाजाला किती टक्के आरक्षण मिळणार, याची जोरदार चर्चा सुरू असून, त्याचा फैसला अधिवेशनात होणार आहे.मागासवर्ग आयोगाने



मागील आठवड्यात मुख्यमंत्र्यांकडे अहवाल सुपूर्द केला. मराठा समाजाला शिक्षण व सरकारी नोकरीत स्वतंत्र आरक्षण देण्याची शिफारस आयोगाने केली आहे. त्या आधारे विशेष अधिवेशनात विधेयक मांडले जाणार आहे.अडीच कोटी कुटुंबांचे करण्यात आले सर्वेक्षणमराठा समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगामार्फत राज्यातील अडीच कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. राज्यातील अंदाजे अडीच कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. हे सर्वेक्षण २ फेब्रुवारी रोजी पूर्ण करण्यात आले.आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकेल काय?पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना जून २०१४ मध्ये मराठा समाजाला शिक्षण आणि नोकरीत १६ टक्के आरक्षण देण्यासाठी अध्यादेश काढला होता. मराठा समाजाची लोकसंख्या ३२ टक्के गृहीत धरून हा १६ टक्क्यांचा आकडा काढण्यात आला होता; मात्र अध्यादेशाला पुढे न्यायालयात आव्हान देण्यात आल्याने ते आरक्षण टिकू शकले नव्हते.२०१८ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर मराठा समाजासाठी आरक्षणाचा कायदा करण्यात आला. त्यास उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. न्यायालयाने १६ टक्के आरक्षण रद्द करीत नोकरीत १२ आणि शिक्षणात १३ टक्के आरक्षण मान्य केले. आरक्षणाची हीच टक्केवारी सरकारतर्फे मांडल्या जाणाऱ्या विधेयकात असणार आहे; मात्र उच्च न्यायालयाने मान्य केलेले आरक्षण पुढे सर्वोच्च न्यायालयात टिकू शकले नाही.मंत्रिमंडळाची विशेष बैठकमागासवर्ग आयोगाने सुपूर्द केलेला अहवाल विधानसभेत मांडला जाणार आहे; मात्र त्यापूर्वी हा अहवाल मंत्रिमंडळाने स्वीकारणे गरजेचे आहे. त्यासाठी विशेष अधिवेशन सुरू होण्यापूर्वी सकाळी मंत्रिमंडळाची विशेष बैठक होणार आहे. या बैठकीनंतर ११ वाजता राज्यपालांचे अभिभाषण आणि अभिभाषणानंतर अधिवेशनाच्या कामकाजाला सुरुवात होईल. **कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला टिकणारे, कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी विशेष अधिवेशन सरकारने घेतलेले आहे.**

**-एकनाथ शिंदे,**

मुख्यमंत्री'ओबीसी'तून आरक्षणाची मागणी करा : जरांगे-पाटीलवडीगोद्री : राज्यातील आमदारांना विनंती आहे, सर्वांनी उद्या अधिवेशनात आवाज उठवावा, मराठा समाजास 'ओबीसी'तून आरक्षण मिळावे, अशी मागणी करावी, 'सगेसोयरे'बाबत मराठा आमदारांनी आवाज उठवावा, अन्यथा त्यांना मराठाविरोधी समजले जाईल, असा इशारामनोज जरांगे-पाटीलयांनी दिला. आम्ही 'ओबीसी'मध्ये आहोत, त्यांना 'सगेसोयरे' कायद्याची अंमलबजावणी करावी लागेल. ४ महिन्यांचा वेळ कायद्याच्या अंमलबजावणीसाठी दिलेला आहे. पुढील आंदोलनाची दिशा अधिवेशन झाल्यावर ठरवू.

## साताऱ्यात शिवजयंती सोहळा थाटात, शिवरायांच्या पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी

**सातारा :** ऐतिहासिक वारसा लाभलेल्या शाहूनगरीत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक युगपुरुषछत्रपती शिवाजी महाराजयांची जयंती मोठ्या दिमाखात साजरी करण्यात आली. पोवई नाक्यावर असलेल्याछत्रपती शिवाजी महाराजयांच्या पुतळ्याला नक्षत्रच्या संस्थापक अध्यक्ष दमयंतीराजे भोसले यांच्या हस्ते पाच नद्यांच्या पाण्याने जलाभिषेक आणि दुग्धाभिषेक घालण्यात आला. यानंतर पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. हजारो शिवभक्तांनी हा देदीप्यमान सोहळा याची देही याची डोळा अनुभवला.

ब्रह्मवृंद्धांच्या मंत्रपठणानंतर सोमवारी सकाळी जलाभिषेक विधीला सुरुवात झाली. दमयंतीराजे भोसले यांच्या हस्ते पाच नद्यांच्या पाण्यांनी विधिवत पद्धतीने छत्रपतींच्या पुतळ्याला जलाभिषेक व दुग्धाभिषेक करण्यात आला. शिवज्योतीचे पूजन करून छत्रपतींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केल्यानंतर शिवभक्तांच्या अस्मितेचे प्रतीक असणाऱ्या शंभर फुटी भगव्या ध्वजाचे अनावरण करण्यात आले. या अनावरणानंतर 'छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी..जय शिवाजी' अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

सकाळी सव्वानऊ वाजता शिवरायांच्या पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी शिवभक्तांनी गगनभेदी घोषणा देत युगपुरुषाला अभिवादन केले.

शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी शिवभक्तांची सकाळपासूनच पोवई नाक्यावर रेलचेल सुरू होती. यावेळी प्रशासक तथा मुख्याधिकारी अभिजित बापट, माजी उपनगराध्यक्ष मनोज शेंडे, माजी नगरसेवक निशांत पाटील, वसंत लेवे, प्रशांत आहेरराव, माजी नगराध्यक्ष स्मिता घोडके, सुजाता राजेमहाडिक, सुनील काटकर, पंकज चव्हाण आदी उपस्थित होते.

## लोकसभेच्या पार्श्वभूमीवर भाजपचे महाराष्ट्रावर विशेष लक्ष केंद्रित

लोकसभेच्या पार्श्वभूमीवर भाजपने महाराष्ट्रावर विशेष लक्ष केंद्रित केले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून, एक्स या समाजमाध्यमावरील पोस्टद्वारे त्यांना अभिवादन केले. तत्पूर्वी रविवारी नवी दिल्लीत भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात पक्ष कार्यकर्त्यांना संबोधित करतानाही मोदींनी शिवरायांचे स्मरण केले होते. अयोध्येत काही दिवसांपूर्वीच पार पडलेल्या राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात स्वामी गोविंद देव गिरी यांनी, पंतप्रधानांनी प्राणप्रतिष्ठेपूर्वी पाळलेल्या कठोर धार्मिक नियमांना तपश्चर्या संबोधत, राज्यकर्त्याने तशी तपश्चर्या केल्याचे केवळ शिवरायांचेच उदाहरण आपल्याला आठवते असे गौरवोद्गार काढले होते. पंतप्रधानांनी शिवरायांना त्यांच्या जयंतीला अभिवादन करणे, हा स्थापित परंपरेचा भाग असला तरी स्वामी गोविंद देव गिरी यांचे उद्गार आणि आपण शिवरायांच्या पदचिन्हांवर चालण्याचा प्रयत्न करीत आहोत अशा आशयाचे स्वतः पंतप्रधानांचे वक्तव्य, हा केवळ योगायोगाचा भाग मानता येणार नाही. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने महाराष्ट्रावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे, हे स्पष्टपणे दिसते आहे. त्यामध्ये काहीही वावगे नाही.- शेवटी महाराष्ट्र हे उत्तर प्रदेशनंतर सर्वाधिक लोकसभा सदस्य असलेले राज्य आहे. गत निवडणुकीत महाराष्ट्रातील ४८ पैकी तब्बल ४१ जागा भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने जिंकल्या होत्या.

अर्थात तेव्हा अविभाजित शिवसेना रालोआचा भाग होती. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीने बरीच नाट्यमय वळणे घेतली. शिवसेनेचे विभाजन झाले आहे आणि त्या पक्षाचा एक गट रालोआत परतला असला तरी, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील गट मात्र काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटासोबत महाविकास आघाडीचा भाग आहे. उद्धव ठाकरेंची शिवसेना तर भाजपची कट्टर विरोधक बनली आहे.

ठाकरे गट मोदींवर अत्यंत कडवट टीका सातत्याने करीत असतो. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात किमान गतवेळी जिंकल्या तेवढ्या जागा जिंकणे, हे भाजपचे उद्दिष्ट आहे; कारण ऋहिंदी हार्टलँड' किंवा ऋकाऊ बेल्ट' या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या उत्तर भारतातील राज्यांमध्ये भाजपची कामगिरी, गत लोकसभा निवडणुकीत अत्युच्च पातळीच्या अगदी निकट जाऊन पोहोचली होती.

## रोहित पवारांच्या अडचणी वाढणार, ईडीकडून नोटीस

### २४ जानेवारीला चौकशीसाठी बोलावलं!

**मुंबई :** राष्ट्रवादीचे अध्यक्षशरद पवारयांचे नातू आणि कर्जत जामखेड मतदारसंघातील आमदाररोहित पवारयांना सक्तवसुली संचालनालय अर्था ईडीने नोटीस बजावली आहे. ईडीकडूनरोहित पवारयांना २४ जानेवारी रोजी चौकशीसाठी हजर राहण्यास सांगण्यात आलंआहे. साखर कारखान्यातील आर्थिक व्यवहारांबाबत शंका असल्याने ईडीने रोहित पवारांना चौकशीसाठी बोलावल्याची माहिती आहे.-ऊत्एठ्ढखडएचएछ्ढगेल्या काही दिवसांपासून रोहित पवारांमागे तपास यंत्रणांच्या चौकशीचा ससेमिरा लागला आहे. रोहित पवारांच्या बारामती ॲग्रोला याआधी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नोटीस पाठवली



होती. त्यानंतर काही दिवसांपूर्वी रोहित पवारांच्या बारामती ॲग्रो या कंपनीशी संबंधित विविध ठिकाणांवर ईडीने धाडी टाकल्या होत्या. आता पुन्हा ईडीने नोटीस पाठवत चौकशीसाठी बोलावलं असल्याने रोहित पवार यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.साखर कारखान्याशी संबंधित प्रकरण काय आहे?

कन्नड सहकारी साखर कारखाना आर्थिकदृष्ट्या अडचणीत आल्यानंतर त्याचा शिखर बँकेतर्फे लिलाव करण्यात आला. ५० कोटी रुपयांना बारामती ग्रोने या कारखान्याची खरेदी केली, असा आरोप आहे. लिलावातील सहभागी बारामती ग्रो, हायटेक इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन इंडिया लि. आणि समृद्धी शुगर प्रा. लि. या कंपन्यांमध्ये एकमेकांत झालेले व्यवहार संशयास्पद असल्याचे बोलले जाते. त्यामुळेच आता रोहित पवार यांना चौकशीचा सामना करावा लागणार आहे.राजकीय आकसातून चौकशी होत असल्याचा आरोपअजित पवार यांनी पक्षाचे अध्यक्षशरद पवारयांच्याविरोधात बंड करत भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला.

मात्र रोहित पवार हे शरद पवार यांच्यासोबत कायम राहिले. आम्ही सत्तेत सहभागी होण्यास नकार दिल्यानेच तपास यंत्रणांच्या माध्यमातून आम्हाला लक्ष्य केलं जातं असल्याचा आरोप याआधीच रोहित पवारांनी केला आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय आरोप-प्रत्यारोपांना आणखीनच धार येण्याची शक्यता आहे.



## काँग्रेसचे १२ खासदार, ४० आमदार भाजपत?

### ३७० जागा जिंकण्याचे लक्ष्य

**दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत ५४३ पैकी ३७० जागा जिंकण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भाजप इतर पक्षांच्या निवडक नेत्यांसाठी आपले दरवाजे खुले करत आहे.भाजपने लोकसभेच्या १६१ जागांवर लक्ष केंद्रित केले आहे. ज्या कधीच जिंकल्या नाहीत, त्या जागा त्यांना आता जिंकायच्या आहेत. त्यासाठी भाजपला इतर पक्षांच्या नेत्यांची मदत घ्यावी लागेल. त्यामुळे अशा नेत्यांच्या प्रवेशाची तपासणी करण्यासाठी चार सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. परंतु तरीही ते अशा जागा जिंकू इच्छित आहेत जिथे पक्षाची ताकद कमी आहे.लक्ष्य किती कुठे? समितीचे पंजाब, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश या राज्यांवर विशेष लक्ष आहे. उर्वरित दक्षिणेकडील राज्यांसाठी भाजपने १० पेक्षा जास्त जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

महाराष्ट्रात काय?महाराष्ट्र, आसाम, उत्तर प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, मध्य प्रदेश या राज्यात भाजपचे अधिकाधिक जागांवर लक्ष आहे.२०१९ मध्ये जिंकलेल्या लोकसभेच्या जागांव्यतिरिक्त पक्ष या राज्यांमधून किमान २५ हून अधिक जागा जोडू शकेल असे भाजपच्या कोअर टीमला वाटते.छिंदवाडा भाजपला अनेक दशकांमध्ये जिंकता आलेली नाही.

इतर पक्षांतील मातब्बर नेते सामील झाले तर पंजाब, पश्चिम बंगाल, ओडिशा, कर्नाटक, झारखंड आणि इतर काही राज्यांतील लोकसभेच्या १० जागांची यात भर पडू शकते. शिवसेना उबाठा गटाकडून राज्यातील १८ मतदारसंघात निवडणूक समन्वयकांची घोषणा करण्यात आली आहे.

**केंद्रीय मंत्री भूपिंदर यादव, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा, महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते आणि सरचिटणीस विनोद तावडे आणि सरचिटणीस (संघटन) बी. एल. संतोष यांचा या समितीत समावेश आहे.काँग्रेसचेडझनभर खासदार, ४० आमदार आणि इतर प्रमुख नेते पुढील तीन आठवड्यांत टप्प्याटप्प्याने पक्ष सोडून भाजपमध्ये प्रवेश करू शकतात, असे वृत्त आहे. समितीचे लक्ष त्या राज्यांवर केंद्रित आहे जिथे भाजपचे मोठे अस्तित्व आहे.**

## पै.महेंद्र गायकवाड ठरला सेना केसरी २०२४ चा मानकरी



### वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा

**हडपसर :** हडपसर मधील हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे फुटबॉल स्टेडियमवर आयोजित करण्यात आलेल्या सेना केसरी कुस्ती स्पर्धेत महेंद्र गायकवाड यांनी प्रथम क्रमांक पटकावून सेना केसरी कुस्ती स्पर्धे तील मानकरी ठरला .मानाच्या राज्यस्तरीय सेना केसरी कुस्ती स्पर्धेत पृथ्वीराज मोहोळ आणि महेंद्र गायकवाड या मोठ्या कुस्तीपटूंमध्ये अटीतटीची स्पर्धा झाली. महेंद्र गायकवाड याने पृथ्वीराज मोहोळवर चुरशीची एकतर्फी मात देऊन मानाचा 'सेना केसरी २०२४ किताब' पहिल्यांदाच पटकावला आहे. अत्यंत कडव्या झालेल्या लढतीत गायकवाड याने मोहोळला धूळ चारत बुलेटसह मानाची गदा पटकावली.

हडपसरच्या हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे क्रीडांगणावर या स्पर्धा पार पडल्या. राज्यातील जवळपास ६०० पैलवानांनी यात सहभाग घेतला होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे शिवसेना शहरप्रमुख यांनी या भव्य राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन केले होते,महाराष्ट्र कुस्तीगीर परिषद यांच्या मान्यतेने या भव्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

शिवसेना पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार भरत गोगावले, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, शिवसेना उपनेते इरफान सय्यद शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे, बाळासाहेब भानगिरे व मान्यवरांच्या हस्ते पुण्याचा विजयी पैलवान महेंद्र गायकवाड याला पाच लाख रोख इनामासह, सेनाकेसरी किताब, सुपर बुलेट गाडी आणि मानाची चांदीची गदा बहाल करण्यात आली. तर सोबतच उपविजेता मल्ल पृथ्वीराज मोहोळ याला तीन लाख रोख, उपसेनाकेसरी किताब देवून गौरविण्यात आले.

महेंद्र गायकवाड आणि पृथ्वीराज मोहोळ यांच्यात झालेल्या मातीवरील निकाली कुस्तीत महेंद्रने प्रतिस्पर्धी पृथ्वीराज या मल्लावर मात करत सेना केसरीचा किताब आपल्या नावावर केला. पृथ्वीराज मोहोळच्या उजव्या पायाला जोरात झटका बसला तरीही तो मोठ्या जोशात ही कुस्ती खेळला.

यावेळी जिल्हाप्रमुख रमेश कोंडे, किरण साळी, निलेश घारे,निलेश गिरमे, महिला आघाडी पूजा रावेतकर, श्रीकांत पुजारी,लक्ष्मण आरडे, सुनिल जाधव, राजाभाऊ भिलारे,संतोष राजपूत, अभिजीत बोराटे, नाना तरवडे,राजेंद्र भानगिरे,अभिमन्यू भानगिरे, उपमहाराष्ट्र केसरी अशोक माने, करण भानगिरे, प्रज्वल भानगिरे, आकाश भानगिरे अमर घुले, विकी माने, दिपक कुलाळ, नितीन लगस व असंख्य शिवसैनिक, कुस्तीप्रेमी उपस्थित होते.

# सर्व भेदभावापासून मुक्तीचा आगाज!

जागतिक सामाजिक न्याय दिन, दरवर्षी २० फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो, सामाजिक न्यायाचा प्रचार आणि जगभरातील गरिबी, असमानता आणि भेदभाव यासारख्या समस्यांचे निराकरण करण्याच्या महत्त्वाची आठवण करून देतो. सामाजिक न्याय हे एक मूलभूत तत्त्व आहे जे शांततापूर्ण आणि समृद्ध समाजांना आधार देते, जिथे प्रत्येक व्यक्तीला समान हक्क, संधी आणि संसाधनांमध्ये प्रवेश असतो. जागतिक सामाजिक न्याय दिनाचे महत्त्व, त्याची उद्दिष्टे, आव्हाने आणि अधिक समान आणि न्याय्य समाजाला चालना देण्यासाठी सामूहिक कृतीची अत्यावश्यक गरज याविषयी सदर संकलित लेखातून माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी देताहेत... संपादक.




वर्ल्ड डे ऑफ सोशल जस्टिस जागतिक स्तरावर २० फेब्रुवारी हा जागतिक सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो. याची सुरुवात २००९मध्ये झाली. तेव्हापासून समाजाला वाळवीसारखी पोकळ बनवणारी सामाजिक दुष्कृत्ये, भेदभाव आणि विषमता संपविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक म्हणून दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. मानवी हक्क आणि जगात पसरलेली असमानता यांच्यामध्ये समाजातील संधी आणि विशेषाधिकारांच्या वितरणात न्याय प्रस्थापित करणे, हे सामाजिक न्यायाच्या कक्षेत येते. लोकांना सामाजिक न्यायाच्या महत्त्वाची जाणीव करून देण्यासाठी, संयुक्त राष्ट्रसंघ दरवर्षी २० फेब्रुवारी रोजी जागतिक सामाजिक न्याय दिवस साजरा करते. प्रयत्नांना गती देणे आवश्यक आहे. सत्य हे आहे की, आपण अजूनही सामाजिक न्यायाशी संबंधित असलेल्या लक्ष्यित उद्दिष्टापासून खूप दूर आहोत. समाजातील प्रत्येक घटकातील प्रत्येक व्यक्ती भय, शोषण, अन्याय, भेदभाव यापासून मुक्त होईल, तेव्हा सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचे वास्तवात रूपांतर होईल. त्याला चांगली उपजीविका आणि सामाजिक सुरक्षा मिळेल. हे तेव्हाच शक्य आहे, जेव्हा आपण समाजाला प्रेरणा देण्यासाठी आपल्या सामूहिक आणि वैयक्तिक प्रयत्नांना गती देऊ.

आपल्या परस्परसंबंधित जगात, सर्व व्यक्तींसाठी समानता, निष्पक्षता आणि सन्मान सुनिश्चित करण्यासाठी सामाजिक न्यायाचा पाठपुरावा हे सर्वोच्च तत्त्व आहे. या प्रयत्नाचे महत्त्व ओळखून, आंतरराष्ट्रीय समुदायाने यंदा २० फेब्रुवारी हा जागतिक सामाजिक न्याय दिन २०२४ म्हणून नियुक्त केला. हा वार्षिक उत्सव भेदभाव, गरिबी, असमानता आणि जागतिक स्तरावर कायम असलेल्या इतर सामाजिक अन्यायांविरुद्ध सुरू असलेल्या संघर्षांची एक मार्मिक आठवण म्हणून काम करतो. जागतिक सामाजिक न्याय दिन, दरवर्षी २० फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो, सामाजिक न्यायाचा प्रचार आणि जगभरातील गरिबी, असमानता आणि भेदभाव यासारख्या समस्यांचे निराकरण करण्याच्या महत्त्वाची आठवण करून देतो. सामाजिक न्याय हे एक मूलभूत तत्त्व आहे जे शांततापूर्ण आणि समृद्ध समाजांना आधार देते, जिथे प्रत्येक व्यक्तीला समान हक्क, संधी आणि संसाधनांमध्ये प्रवेश असतो. हा निबंध जागतिक सामाजिक न्याय दिनाचे महत्त्व, त्याची उद्दिष्टे, आव्हाने आणि अधिक समान आणि न्याय्य समाजाला चालना देण्यासाठी सामूहिक कृतीची अत्यावश्यक गरज याविषयी माहिती देतो.

ऐतिहासिक संदर्भ असे- जागतिक सामाजिक न्याय दिनाची स्थापना संयुक्त राष्ट्र महासभेने सन २००७मध्ये केली होती, ज्याचा उद्देश गरिबी, बहिष्कार, लैंगिक असमानता, बेरोजगारी आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यांसारख्या समस्यांना तोंड देण्याच्या प्रयत्नांना चालना देण्याच्या उद्देशाने आहे. सामाजिक न्यायाच्या तत्त्वांमध्ये रुजलेला, हा दिवस पद्धतशीर असमानता दूर करण्यासाठी आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाची वचनबद्धता अधोरेखित करतो. नागरी हक्क चळवळ, कामगार चळवळ आणि लैंगिक समानतेसाठीच्या संघर्षासह, इतिहासातील विविध सामाजिक न्याय चळवळींमधून ते प्रेरणा घेते.

सामाजिक न्याय काय आहे? तर आधुनिक समाजात सर्व लोकांना समान संधी आणि सुविधा मिळायला हव्यात, हा केवळ सामाजिक न्यायाचाच नव्हे तर, सर्व देशांचा आदर्श आहे. सामाजिक न्यायाचे ध्येय हे सुनिश्चित करणे आहे की, सर्व लोक त्यांच्या सामाजिक भूमिका पार पाडू शकतील आणि समाजाकडून ते पात्र आहेत. यासाठी समाजातील विविध संस्थांना अधिकार व कर्तव्ये दिली जातात जेणेकरून ही उद्दिष्टे साध्य करता येतील.

कधीपासून साजरा केला जातो हा दिवस? तर दि.२६ नोव्हेंबर २००७ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने जाहीर केले की, दरवर्षी २० फेब्रुवारी हा जागतिक सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जाईल. मानवतेला धोका निर्माण करणाऱ्या समस्येचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने या दिवसाची सुरुवात केली. समतेचा प्रसार करताना अन्याय आणि भेदभाव नष्ट करणे, हा त्याचा उद्देश आहे.

सदर दिन साजरा करण्यामागे उद्देश आहे- मानवतेला धोका निर्माण करणाऱ्या समस्येचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने जागतिक सामाजिक न्याय दिन या दिवसाची सुरुवात केली. समतेचा प्रसार करताना अन्याय आणि भेदभाव नष्ट करणे, हा त्याचा उद्देश आहे. याबाबत आपण समाजाला प्रेरणा देण्यासाठी आपल्या सामूहिक आणि वैयक्तिक प्रयत्नांना गती वाढवायला हवी. सन २०२२च्या जागतिक सामाजिक न्याय दिनाची थीम- औपचारिक रोजगाराद्वारे सामाजिक न्याय मिळवणे, ही होती. तर सन २०२१च्या जागतिक सामाजिक न्याय दिनाची थीम- डिजीटल अर्थव्यवस्थेतील सामाजिक न्यायासाठी आवाहन, ही होती. दैन्य, दारिद्र्य, जाती, धर्म, वर्ण, व्यवसाय किंवा जन्म यांवरून माणसामाणसांत भेदभाव होता कामा नये. प्रत्येकास सौजन्यपूर्ण वागणूक दिली गेली पाहिजे. तरच या दिनाचे महत्त्व अबाधित राहील.

## सुंदरगडावर शिवजन्मोत्सव पारंपारिक पद्धतीने साजरा

### शिवनेरी नंतर सुंदरगडावर छत्रपतींचा झुलला पाळणा

**पाटण :-** किल्ले सुंदरगड (दात्तेगड) वर शिवजन्मोत्सवासह शिवयात्रा उत्साहात साजरी करण्यात आली. पारंपारिक वेशभूषातील शिवकन्या यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रतिमेचे पुजन करुन हारफुलांनी सजविलेल्या पाळण्यात प्रतिमा ठेवून छत्रपतीचां सामुहिक पाळणा म्हणला. यावेळी शिवमावळ्यांनी शिवगर्जनेच्या घोषणा देऊन किल्ल्यावर इतिहासीक माहोल तयार केला. या जन्मोत्सव सोहळ्यानंतर सुंदरगडावरुन हारफुलांनी सजवलेल्या पालखीतून शिवप्रतिमेची पारंपारिक वाद्य, झांज पथकाच्या निनादात मिरवणूक काढण्यात आली. या शिवजन्मोत्सव सोहळ्याला शिवमावळ्यांसह शिवकन्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



शिवजयंतीच्या पूर्वसंध्ये पासून सुंदरगडावर शिवमावळ्यांची शिवजन्मोत्सव सोहळ्यासाठी लगबग सुरु होती. आदल्या दिवशी गडावर आलेल्या शिवमावळ्यांनी गडाची स्वच्छता केली. गडावरील सर्व देवदैवत्तांचे पूजन करून गड भगव्या पताक्यांनी सजविण्यात आला. रात्रभर सुंदरगडावर शिवज्योतींचे आगमन सुरु होते. सोमवारी पहाटे गडाच्या खंजीर दरवाजा प्रवेश द्वारात सडा शिपंडून शिवकन्यांनी रांगोळी काढली. बाल छत्रपतींचा पाळणा हारफुलांनी सजविला. व शिवप्रतिमेचे पुजन करुन छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी उपस्थित शिवकन्या यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा सामुहिक पाळणा म्हणला.

शिवजन्मोत्सव सोहळ्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची हारफुलांनी सजविलेल्या पालखीतून पारंपारिक पद्धतीने गडावर मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मयूर उबाळे आणि सहकारी यांचे जय तुळजाभवानी संबळ पथक, पाटण या मिरवणूकीचे आकर्षण ठरले. यावेळी उपस्थित शिवमावळे - शिवकन्यांनी शिवगर्जनेच्या घोषणा देत गड दणाणून सोडला. किल्ले सुंदरगडावरील शिवजन्मोत्सव, पालखी सोहळ्यात सुंदरगड संवर्धन समितीचे मावळे शिवप्रेमी मनोहर यादव, माजी सरपंच नारायण डिगे, पिंपळोशी सरपंच विशाल निकम, किसन मांडावकर, नथुराम साळुंखे, वनपरिक्षेत्र जवान निखिल कदम, शंकर मोहिते, लक्ष्मण चव्हाण, राम साळुंखे, संतोष मांडावकर, दिपक साळुंखे, महेश पवार, संजय साबळे, कोमल मांडावकर, पाटण वनपरिक्षेत्राचे जवान यासह टोळेवाडी- घेरादातेगड, पिंपळोशी, केरळ, पाटण आदी ग्रामस्थ, यांच्यासह गड परिसरातील अबालवृद्धासह, शिवमावळे शिवकन्या मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## ग्रामस्थांच्यावतीने शिवजयंती उत्साहात साजरी

### मी उमेदवार आहे, समजून लोकसभेच्या उमेदवाराला विजयी करा

**वळती :** शिवज्योत उत्सवाचे नववे वर्ष असुन शिवज्योत सोमवारी ( दि.१९ ) शिवनेरी गडावरून गावात आणली जाते . शिवनेरी वरून शिवज्योतीचे प्रथम भोकरवस्ती येथे आगमन झाले . भोकरवस्ती येथुन शिवज्योत ढोल - ताशाच्या गजरामध्ये वळती गावात आणण्यात आली . रस्त्यामध्ये अनेक शिवभक्त महिलांनी सडा - रांगोळी टाकुन शिवज्योतीचे पुजन केले . गावात भव्यदिव्य प्रवेशद्वार व अश्वारूढ पुतळा असुन पुतळयाळा फुलांची आरास व लाईट डेकोरेशन करण्यात आले होते . महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला गावातीलच वीर जवान सशस्त्र सिमा बल सैनिक मयुर दळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला . शिवज्योतीचे गावात आगमन झाल्यानंतर ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात शिवज्योतीचे पुजन केले. यावेळी सर्व क्षेत्रातील मान्यवर



तसेच महिला , तरुण वर्ग व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता . शिवनेरी किल्ल्यावरून शिवज्योत घेऊन आलेल्या सर्व शिवभक्तांचे ग्रामस्थांनी विशेष कौतुक केले .

गावात शिवज्योतीचे आगमन झाल्यानंतर ढोल ताशाने परिसर दणानुन सोडला. ढोल ताशाने शिवभक्तांचे व उपस्थितांचे लक्ष वेधुन घेतले . यावेळी शालेय विद्यार्थ्यांची भाषणे झाली . या कार्यक्रमा नंतर सर्व शिवभक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले .

## फेब्रुवारीतच धरणांनी गाठला तळ...

**मुंबई :** राज्यातील बहुतांशी धरणांनी तळ गाठला असून, गतवर्षीच्या तुलनेत सरासरी २१.६१ टक्के कमी पाणीसाठा शिल्लक आहे. राज्यातील १२ प्रकल्प सध्या मायनसमध्ये असून, १५ धरणांमध्ये जेमतेम दहा टक्क्यांच्या आसपास साठा आहे. मराठवाड्याची परिस्थिती चिंताजनक आहे. मराठवाड्यात फक्त २६ टक्के जलसाठा शिल्लक आहे. गतवर्षी तो ७२ टक्के होता.राज्यातील १३८ प्रमुख धरणांत गतवर्षी ७४.३४ टक्के साठा होता, तो सध्या ५०.३७ टक्क्यांवर आला आहे.२६०मध्यम प्रकल्पांत गतवर्षी ६७.६८ टक्के साठा होता,तो यंदा ५३.०३ टक्क्यांवर आला आहे.२,५९६लघु प्रकल्पांत गतवर्षी आज रोजी एकूण पाणीसाठा ५५.६४ टक्के होता, तो ३९.१५ टक्क्यांवर आला आहे.२,९९४प्रकल्पांत गतवर्षी ७०.७० टक्के असलेला साठा यंदा ४९.०९ टक्क्यांवर आला असून, तो २१.६१ टक्के कमी आहे.१२ धरणे मायनसमध्येराज्यातील कलीसरार (गोंदिया), खडकपूर्णा (बुलढाणा), बोरगाव अंजनपूर व सिरसमार्ग (बीड), मंगरुळ किनवट (नांदेड), किल्लारी, मदनसुरी, सीना कोळेगाव, राजेगाव (धाराशिव), शिवणी (लातूर), लोणावळा टाटा (पुणे) आणि उजनी (सोलापूर).१५ धरणे जेमतेम ाकळगाव देवळा (लातूर) ४.९२% बिंदगीहाळ (लातूर) १७.७८%

## शिवजयंती निमित्त आयडियल एज्युकेशन संस्थेच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**हडपसर :** छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या ३९४ जयंतीचे औचित्य साधून हडपसर सय्यदनगर मधील आयडियल एज्युकेशन ट्रस्टच्या वतीने आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सय्यदनगर चिंतामणी नगर महंमदवाडी परिसरातील नागरिकांकरिता मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे निमित्ताने या परिसरातील नागरिकांकरिता आरोग्याच्या विविध सोयीसुविधा अल्पदरात पोहोचवण्याकरिता तसेच आरोग्याच्या बाबतीत जागरूकता मोहीम राबविण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा शफी इनामदार यांनी दिली. नेत्रतज्ञ डॉ. अबोली इनामदार आणि दंतचिकित्सक डॉ. मुसद्दीक इनामदार यांच्या



नेतृत्वाखाली महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे सुमतिभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय, साने गुरुजी आरोग्य केंद्र आणि महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन सोसायटीच्या एम ए रंगूनवाला डेंटल कॉलेज तसेच झेड व्ही एम युनानी मेडिकल कॉलेज येथून सुमारे ७० डॉक्टरांची टीम या आरोग्य शिबिरासाठी मैदानात उतरली होती. सय्यद नगर व परिसरातील नागरिकांकरिता या शिबिरामध्ये बालरोग, स्त्रीरोग, पंचकर्म, नेत्र तपासणी, दंत तपासणी, हृदयरोग साथीचे रोग, मधुमेह अशा विविध वैद्यकीय तपासणी मोफत करण्यात आली. या आरोग्य शिबिरामध्ये १०५३ नागरिकांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला तसेच ८० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया अल्पदरात करणार असल्याची माहिती प्रा शोएब इनामदार यांनी दिली. यावेळी परिसरातील विद्यार्थी तसेच शिक्षकांची ही मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन कार्याध्यक्ष फहीम इनामदार यांनी केले होते.

शिबिरास माजी आमदार महादेव बाबर, नंदा लोणकर, मोहम्मदन खान, ख्वाजा पठाण, बाळकृष्ण विधाते आदी मान्यवरांनी या शिबिरास उपस्थित होते . रिफान इनामदार यांनी सर्व आरोग्य केंद्र व आरोग्य महाविद्यालयांचे आभार मानले.

## छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंतीनिमित्त फुरसुंगी गावात विविध कार्यक्रम

**हडपसर :** रयतेचे राजे छत्रपती शिवाजीमहाराज यांची ३९४ वी जयंतीनिमित्त फुरसुंगी येथील छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

शिवजयंती उत्सव व शिवधर्म सुशोल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने फुरसुंगी मध्ये शिवजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते . शिवराय मनामनात शिवजयंती घराघरात साजरी झाली पाहिजे ही संकल्पना घेऊन परिसरातील नागरिकांना आव्हान करून कमिटीच्या वतीने पुरस्कार देऊन प्रोत्साहन व प्रेरणा मिळावी या दृष्टिकोनातून हा उपक्रम राबवला जात आहे ,



मुलांना स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी शुक्रवारी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक फुरसुंगी गाव बस स्टॉप या ठिकाणी प्रबुद्ध साठे यांचे शिवाजीमहाराज यांच्या जीवनावर व्याख्यान होणार तसेच छत्रपती शिवाजी महाराज जीवन गौरव पुरस्कार आदर्श माता पिता देऊन सन्मानित करण्यात येणार आहे गावातील उच्चशिक्षित व यश संपादन केलेल्या तरुणांच्या माता पिता त्यांना हा पुरस्कार यावेळी देण्यात येणार आहे अशी माहिती संभाजी ब्रिगेडचे पुणे जिल्हा अध्यक्ष उत्तम कामठे यांनी दिली.

छत्रपती शिवाजी पुतळा या ठिकाणी अभिवादन सोहळा आयोजित केला होता यावेळी शिवजन्मोत्सव शिवजन्माचा पाळणा व जिजाऊ वंदना गात गावातील महिलांनी शिवजन्मोत्सव साजरा केला. यावेळी संभाजी ब्रिगेड पुणे जिल्हाध्यक्ष उत्तम कामठे प्रा. अनिल कामठे ,सुनील भाडळे, विजय गुंड, चंदन हरपळे ,बकुलेश हरपळे, उज्वला कामठे, रुक्मिणी कामठे, कांताबाई फाटे, वंदना फाटे, मनिषा कामठे, शिवांजली कामठे ,शिवतेज कामठे, सह नागरिक उपस्थित होते.

उद्याच्या अधिवेशनात मराठा समाजाला आरक्षण देणार; मुख्यमंत्र्यांची घोषणा

# किल्ले शिवनेरी गडावर शिवजयंती उत्साहात साजरी

**नारायणगाव** : मराठा आरक्षणासाठी मंगळवार (दि.२०) रोजी विधीमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. ओबीसी आणि इतर समाज घटकाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी हे विशेष अधिवेशन घेण्यात येणार आहे. उद्याच्या अधिवेशनातून मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज किल्ले शिवनेरी गडावर जाहीर केले.






छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त किल्ले शिवनेरी गडावर मराठा सेवा संघाच्या वतीने शिवजयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, खासदार डॉ अमोल कोल्हे आमदार अतुल बेनके, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी आमदार शरद सोनवणे या कार्यक्रमाला उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, ''शासनाने दांडपट्टा या शस्त्राला राजशस्त्र म्हणून घोषित केले आहे. तसेच लवकरच लंडनहून वाघनखं महाराष्ट्रात आणणार आहोत. शिवरायांना अभिप्रेत असलेलं सुराज्य आपल्याला निर्माण करायचं आहे.''

शिवजयंतीनिमित्त शिवनेरी किल्ल्यावर जाऊन शिवजन्मोत्सव सोहळ्यात सहभागी होत छत्रपती शिवाजी महाराजांना विनम्र अभिवादन केले. दरवर्षीप्रमाणे शिवजन्मस्थानी पारंपरिक वेशातील महिलांनी शिवरायांच्या जन्माचा पाळणा गायला. यावेळी शासकीय मानवंदना देत शासकीय बँड पथकाद्वारे राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले. तसेच यानंतर बाल शिवराजांची पालखी काढण्यात आली. किल्ल्यावर शिवाजी महाराजांबद्दल माहितीपर पोवाडे, लेझीम द्वारे नृत्य नाटिका यांचे सादरीकरण करण्यात आलं. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज जीवनगौरव पुरस्कार व शिवनेरी भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यंदाचा मानाचा छत्रपती शिवाजी महाराज जीवनगौरव पुरस्कार हा पोलीस दलातील कार्यक्षम अधिकारी दिलीप भुजबळ यांना प्रदान करण्यात आला. ब्रिगेडियर अनिल काकडे व शास्त्रज्ञ रवींद्र साबळे यांना शिवनेरी भूषण पुरस्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते देण्यात आला.

उपमुख्यमंत्री अजित पवार व देवेंद्र फडणवीस यांनी शत्रपती शिवाजी महाराजांची महती आपल्या मनोगतातून विशद केली. निसर्ग चक्रीवादळात जुन्नर आंबेगाव खेड येथील आदिवासी शेतकऱ्यांचे हिरडा पिकाचे जे नुकसान झाले त्याची नुकसान भरपाई देण्यात येईल अशी माहिती दोन्हीही उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणातून दिली.

अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जगभरात साजरी होत असते. यानिमित्ताने जगभरातून अनेक शिवप्रेमी किल्ले शिवनेरीवर येऊन नतमस्तक होतात. यावेळी सहकार मंत्री दिलीपराव वळसे पाटील, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार अतुल बेनके, आशाताई बुचके, माजी खासदार शिवाजी आढळराव पाटील, माजी आमदार शरद सोनवणे, साखर कारखान्याचे चेअरमन सत्यशील शेरकर, ज्योती विनायक मेटे, जिल्हाधिकारी सुहास दिवसे, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, उपवनसंरक्षक अमोल सातपुते तसेच पुणे जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धावत्या एसटीच्या चालकाला हृदयविकाराचा धक्का

३१ प्रवाशांचे जीव वाचले, वारुंजी गावच्या हद्दीतील घटना

**कराड** - वारुंजी ता.कराड गावच्या हद्दीत माऊली हॉटेल समोर पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर धावत्या एसटीच्या चालकाला हृदयविकाराचा धक्का बसला. यातही चालकाने प्रसंगावधान दाखवत एसटी महामार्गाच्या दुभाजकावर चढवून थांबल्याने ३१ प्रवाशांचे जीव वाचले. त्यानंतर उपचारादरम्यान चालकाचा मृत्यू झाला. सोमवारी ही घटना घडली.

राजेंद्र विष्णू बुधावले (रा. सुळेवाडी, ता. खानापूर, जि. सांगली) असे संबंधित एसटी चालकाचे नाव आहे. याबाबत वाहक फारुक कासीम शेख (रा. विटा) यांनी कराड शहर पोलिसात खबर दिली आहे. पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, विटा आगाराची विटा ते स्वारगेट ही एसटी घेवून चालक राजेंद्र बुधावले व वाहक फारुक शेख हे दोघेजण कडेगावमार्गे कराडमध्ये आले. कराड बसस्थानकातून सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास एसटी साताऱ्याकडे जाण्यासाठी निघाली. त्यावेळी एसटीत ३१ प्रवासी होते. एसटी महामार्गावर वारुंजी गावच्या हद्दीत आली असताना चालक बुधावले यांना हृदयविकाराचा तिव्र धक्का बसला. त्यामुळे त्यांनी धावती एसटी दुभाजकावर घालून तेथेच थांबवली. अचानक एसटी थांबल्यामुळे वाहक फारुक शेख हे केबिनजवळ गेले. त्यावेळी चालक बुधावले यांना प्रचंड घाम आला होता. तसेच चक्कर येत असल्याचे ते म्हणत होते. त्यामुळे वाहक शेख यांनी तातडीने सर्व प्रवाशांना खाली उतरवून दुसऱ्या एसटीत बसवले. तसेच चालक बुधावले यांना रिक्षातून साई रुग्णालयात दाखल केले. त्याठिकाणी उपचार सुरू असताना बुधावले यांचा मृत्यू झाला. याबाबतची नोंद कराड शहर पोलीस ठाण्यात झाली आहे.

तुमच्यात हिम्मत असेल तर मला अडवून व रोखून दाखवा

# खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचे श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांना उघड चॅलेंज

**फलटण** - मी विकासाची कामे करीत असताना,फलटण तालुक्यातील नेत्यांकडून नेहमी नकारघंटा येते,अशा नकारघंटा वाजविणाऱ्यांना आता वाजवायची वेळ आली असून ते मला म्हणतात की तिकीट मिळू देणार नाही,पण तुमच्यात हिम्मत असेल तर मला रोखून दाखवा,माझ्यासाठी खणत असलेल्या खड्ड्यात तुम्हीच पडणार असल्याचा टोला श्रीमंत रामराजे यांना लागवत कित्येक वर्षे मंत्रिपद असताना तुम्ही बारामती ची चाकरी केली असा घणाघात खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी केला.



निरा देवधर प्रकल्प अंतर्गत निरा देवधर सुरवडी शाखा कालवा (बंदिस्त पाईप) किमी 0 ते ३० या कामाचा शुभारंभ व भूमिपूजन समारंभ प्रसंगी माढा लोकसभेचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर बोलत होते,यावेळी संगोल्याचे आमदार शहाजी बापू पाटील,भाजपचे जेष्ठ नेते प्रल्हादराव साळुंखे पाटील,जिजामाला नाईक निंबाळकर,जयकुमार शिंदे,विश्वासराव भोसले,हणमंत मोहिते,अभिजित नाईक निंबाळकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना खा.रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी सांगितले की येणाऱ्या दोन वर्षात संपूर्ण फलटण तालुका हिरवागार होणार असून,आज दुष्काळ संपविण्याच्या दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ होत आहे.सध्या फलटण तालुक्यात अफवांचा पाऊस पिकला असून मला खासदरकीच तिकीट मिळणार नाही,पण तुमच्यात दम असेल तर मला रोखून दाखवा,निरा देवधर चे पाणी आणून मला दुसरा कारखाना काढायांचा का अशी माझ्यावर टीका केली जात आहे, माझ्यात धमक आहे दुसरा काय तिसरा कारखाना सुद्धा काढेन ,पण तुमच्यात धमक आहे का,असलेल्या संस्था चालवायची?तुम्ही सर्व संस्था एकतर मोडीत काढल्या किंवा दुसऱ्याला चालवायला दिल्यात हे विसरू नका,तुम्ही मला जेवढ्या शिव्या द्याल तेवढा तुमचा गटातील लोक तुम्हाला सोडून जातील हे लक्षात ठेवा आता सर्वसामान्य जनतेला कळलं आहे की कोण विकास करतंय अण कोण विकासाला आड येतंय,त्या विकासामुळे आज माझ्यामागे सर्व नेतेमंडळी ताकदीने उभे राहिले आहेत असे खासदार रणजितसिंह यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझा प्रत्तेक शब्द पाळला असून फलटण तालुक्यासह माढा मतदारसंघातिल सर्व पाणी योजना रस्ते,रेल्वे,असे प्रकल्प मार्गी लागले असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,व दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी मला सहकार्य केले,यंदा दुष्काळी परिस्थिती असून तब्बल पाच टीएमसी पाणी धरणात कमी आहे,त्या मुळे लवकरात लवकर या योजना पूर्ण होऊन शेतकऱ्यांच्या बांधा पर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी माझे प्रयत्न सुरू असल्याचे खा.रणजितसिंह यांनी सांगितले.

वाघोशी पर्यंत आलेलं पाणी २५ वर्षे अडलं, तुम्ही मंत्री ३०/३० वर्षे होता, सीमेवरील पाणी होत ते का आलं नाही हे जनतेला समजले असून,आम्ही विकासाचा दिवा लावायला व त्यांनी फुकायचा हा यांचा उद्योग असून मी बारामती करांना घाबरलो नाही तर तुम्हाला काय घाबरणार?असे ठणकावून सांगत आ.श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांच्यावर कडाडून टीका केली, तुमच्यात जेवढा दम आहे तेवढा दम लावा,आण मला रोखा,हे सांगत आहेत की तिकीट मिळून देत नाही,माझं तिकिटाचे सोडा माझ्यावर टीका करीत सुटल्याने तुमचे लोक मला भेटण्यासाठी पुण्या पर्यंत येत आहेत त्यामुळे तुमचा गट शाबूत ठेवा अन्यथा लोक तुमच्या गटात राहणार नाहीत असे खा.रणजितसिंह यांनी सांगितले.

# खरेदी -विक्री संघाच्या निवडणुकी आधीच महायुतीच्या दहा जागा बिनविरोध

उर्वरित ९ जागांसाठी २० उमेदवार रिंगणात

**वडगाव मावळ** : मावळ तालुका खरेदी विक्री सहकारी संघाची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप व शिवसेना (शिंदे गट) अशी महायुती च्या माध्यमातून लढविण्याचा निर्णय झाला असून निवडणुकीआधीच महायुतीच्या दहा जागा बिनविरोध झाल्या आहेत तर उर्वरित ९ जागांसाठी २० उमेदवार रिंगणात आहेत.

राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष बापूसाहेब भेगडे, जिल्हा दूध संघाचे संचालक बाळासाहेब नेवाळे, भाजपचे प्रभारी भास्करराव म्हाळसकर, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते बबनराव भेगडे, तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, भाजपचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब गुंड, माजी सभापती ज्ञानेश्वर दळवी, शिवसेना (शिंदे गट) चे तालुकाप्रमुख राजेश खांडभोर यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे महायुतीचा पॅनल जाहीर केला आहे.

खरेदी विक्री संघाची निवडणूक प्रक्रिया सुरू असून एकूण १९ जागांपैकी अ वर्गातील ५ जागा बिनविरोध झाल्या आहेत तर ब वर्गातील २, महीला प्रतिनिधी २ व भटक्या विमुक्त जाती गटातील १ अशा एकूण १0 जागा बिनविरोध झाल्या आहेत. उर्वरित ९ जागांसाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप व शिवसेना (शिंदे गट) महायुती च्या वतीने महायुती सहकार पॅनल च्या माध्यमातून निवडणूक जिंकण्याचा निर्धार केला आहे. तर काँग्रेसनेही क वर्ग, इतर मागास प्रवर्ग गटात उमेदवार दिले आहेत.

**बिनविरोध विजयी झालेले उमेदवार पुढीलप्रमाणे :**

तळेगाव : रुपेश घोजगे, साळुंब्रे : बाजीराव वाजे, लोणावळा : भरत येवले, कोथूर्णे : ज्ञानेश्र्वर निंबळे, आंबेगाव : शहाजी कडू

ब वर्ग - प्रमोद दळवी, आशा मारुती खांडभोर

महीला प्रतिनिधी : मनीषा आंबेकर, सुनीता केदारी

भटक्या विमुक्त जाती - शरद नखाते

महायुती पॅनल मधील उमेदवारांची नावे पुढीलप्रमाणे :

अ वर्ग - टाकवे गट : शिवाजी असवले (महायुती), प्रकाश देशमुख, शांताराम लष्करी, शिवली गट : धनंजय टिळे (महायुती), विष्णू घरदाळे, खडकाळा: संतोष कोंढरे (महायुती), रमेश भुरुक, वडगाव : निलेश म्हाळसकर(महायुती), एकनाथ येवले, क वर्ग - किरण हुलावळे, माणिक गाडे, गणेश विनोदे (तिघेही महायुती), बबन आरडे, मारुती असवले, सदाशिव सातकर, इतर मागास प्रवर्ग : अमोल भोईरकर (महायुती), काळूराम थोरवे, खंडू तिकोणे अनुसूचित जाती जमाती : मधुकर जगताप (महायुती), नारायण चिमटे,

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या माण तालुका अध्यक्षपदी बाळासाहेब काळे यांची निवड



**सातारा येथे बाळासाहेब काळे यांना नियुक्तीपत्र देताना आ रामराजे नाईक निंबाळकर व पदाधिकारी.**

**बिदाल** : राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या माण तालुका अध्यक्षपदी माण कृषी बाजार समितीचे संचालक मा.सरपंच बाळासाहेब काळे यांची निवड करण्यात आली आहे. विधान परिषदेचे माजी सभापती आमदार रामराजे नाईक निंबाळकर,जिल्हाध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, कार्याध्यक्ष अमित कदम ,महिला जिल्हाध्यक्ष सोनालीताई पोळ ,मा. जिल्हा परिषद अध्यक्ष सुभाष नरळे सर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

सातारा येथे शासकीय विश्रामगृहात राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत पक्षातर्फे राबवण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची माहिती देण्यात आली.यावेळी जिल्हा बँकेचे संचालक दत्तानाना ढसाळ, मनोजदादा पोळ, अरविंद कदम व राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माण तालुक्यातील पदाधिकाऱ्यांना प्रमाणात संधी दिली आहे. येत्या लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषदांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून या निवडी महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

तालुकाध्यक्ष बाळासाहेब काळे म्हणाले, उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक - निंबाळकर, आमदार मकरंद पाटील यांच्या मान्यतेने पक्ष संघटना बळकटीसाठी तसेच पक्ष विचारधारा तळागाळत पोहचवण्यासाठी प्रयत्न करीन.

# कोरेगावच्या उपअधीक्षकपदी सोनाली कदम यांची नियुक्ती

**कोरेगाव** : कोरेगाव पोलिस उपअधीक्षक पदी खेड (जि. रत्नागिरी) येथे कार्यरत असणाऱ्या सोनाली कदम यांची नियुक्ती झाली असून, आज त्यांचे मावळते पोलिस उपअधीक्षक राजेंद्र शेळके यांनी त्यांच्या कार्यालयात स्वागत केले.

फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात येथील पोलिस उपअधीक्षक राजेंद्र शेळके यांची पुणे येथे एक टप्पा पदोन्नतीने बदली गुन्हे अन्वेषण विभागामध्ये (सीआयडी) अतिरिक्त पोलिस अधीक्षकपदी पदोन्नतीने होऊन त्यांच्या जागेवर पदस्थापनेच्या प्रतीक्षेत असलेल्या सुहास त्रिंबकराव शिंदे यांची नियुक्ती झाली होती. मात्र, ते हजर झाले नव्हते. आता पोलीस उपाधिक्षक राजेंद्र शेळके यांच्या जागी सोनाली कदम यांची नियुक्ती झाली असून, त्यांचे आज डी



**कोरेगाव : सोनाली कदम यांचे स्वागत करताना राजेंद्र शेळके.**

.वाय. एस. पी. राजेंद्र शेळके यांनी स्वागत केले आहे खेड (जि. रत्नागिरी) येथे सोनाली कदम या कार्यरत होत्या.

# आम्ही केलेल्या कामाचे श्रेय घेण्याचा खासदारांचा प्रयत्न : आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर

**फलटण** : भौगोलिक परिस्थितीमुळे नाईकबोमवाडी परिसरात कृष्णेचे पाणी पोहोचण्यास उशीर झाला आहे, तथापि हा भाग पाण्यावाचून वंचित राहणार नाही, त्यासाठी बोगदा काढून पाणी आणण्याची योजना मंजुरीच्या अंतीम टप्प्यात आहे, लवकरच प्रत्यक्ष कार्यवाही होईल आणि पुढच्या

आवर्तनावेळी पाणी या भागात पोहोचेल याची ग्वाही आ.श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी दिली.



नाईकबोमवाडी, ता. फलटण येथे सुमारे १ कोटी १७ लाख रुपये खर्चाच्या विविध विकास कामांची उदघाटने व भूमिपूजन समारंभानंतर आयोजित जाहीर सभेत मार्गदर्शन करताना आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर बोलत होते. अध्यक्षस्थानी आ. दिपकराव चव्हाण होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष माणिकराव सोनवलकर, श्रीराम कारखान्याचे चेअरमन डॉ. बाळासाहेब शेंडे, संचालक मारुती सांगळे, तालुका सहकारी दूध पुरवठा संघाचे चेअरमन धनंजय पवार, शंभूराज नाईक निंबाळकर, दत्तात्रय शिंदे, संतोष जगताप, शंभूराज बेलदार पाटील, अक्षय गायकवाड, निंभोरे सरपंच सौ. कांचन निंबाळकर, झिरपवाडी सरपंच सौ. वर्षा बोरकर, ढवळेवाडी (निंभोरे) सरपंच सौ. रेखा माने, पोपटराव हगारे, जाधववाडी (माण) सरपंच विकास निंबाळकर, विकास सोसायटी चेअरमन उदयसिंह खुसपे, व्हा. चेअरमन दादासाहेब चव्हाण, दूध संकलन केंद्र माणिकराव चव्हाण, निवृत्ती वामन खुसपे, शामराव चव्हाण, दत्तात्रय चव्हाण, सोमनाथ चव्हाण, मिथुन चव्हाण, माणिकराव चव्हाण, विजयराव नेटके, लक्ष्मणराव कारंडे, धीरज चव्हाण, दिलीपराव आवळे, निवृत्ती खुसपे, धीरज खुसपे, दादासाहेब चव्हाण, देवराज चव्हाण, दिपकराव चव्हाण, सोपानराव चव्हाण यांच्यासह नाईकबोमवाडी व पंचक्रोशीतील विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, महिला, तरुणवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

**आयत्या पिठावर रेघोट्या**

कृष्णेचे पाण्यासह संपूर्ण विकास आपण केल्याचे सांगून श्रेय घेण्याचा खासदारांचा प्रयत्न म्हणजे आयत्या पिठावर रेघोट्या असल्याची टीका करीत आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्यावर सडकून टीका केली.

**कापड बाजार व लोखंडी जथ्यात केला होता निर्धार**

अपक्ष म्हणून विधानसभा निवडणूक प्रचार दरम्यान कायम दुष्काळी पट्ट्यातील हजारो एकर पिकाऊ जमीन पाण्यावाचून पडीक ठेवून शेतकरी मुंबईतील लोखंडी जथ्यात किंवा कापड बाजारात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राबताना पाहिल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत दुष्काळी पट्ट्यात पाणी आणण्याचा निर्धार आपण केला होता, लोकांनी अपक्ष असूनही भरभरुन मतदान केल्याने आपला उत्साह दुणावला आणि विधान सभेत पोहोचताच पाण्याच्या प्रश्नाला प्राधान्य देवून प्रयत्न सुरु केल्याचे आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी निदर्शनास आणून दिले.

**अपक्षांच्या पाठिंब्याने सरकार स्थापन**

त्यावेळी सत्ता स्थापनेसाठी कोणत्याही राजकीय पक्षाला पुरेसे बहुमत मिळाले नाही, मात्र पाण्याच्या प्रश्नावर प्रस्थापितांचा पराभव करुन कायम दुष्काळी पत्त्यातून ४०/४२ अपक्ष आमदार सभगृहात दाखल झाले होते, त्यांना एकत्र करुन सत्ता स्थापनेसाठी तत्कालीन मनोहर जोशी सरकारला पाठिंबा देत पाण्याचा प्रश्न सोडविण्याची अट घातली त्यांनी ही ते मान्य केले पण तिजोरीत पैसा नसल्याने पुन्हा अडचण निर्माण झाल्याचे सांगत त्यावरही आपण तोडगा काढून महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाची स्थापना केली आणि त्यामाध्यमातून रोखे काढून पैसा उभा केल्याचे आ. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर यांनी निदर्शनास आणून दिले.

**५ वर्षात पाणी अडविण्याचे काम कठीण होते**

विधी मंडळ आणि सरकारचे काम सुरु झाले त्यावेळी राज्याच्या वाट्याचे पाणी ऑगस्ट २००० पर्यंत अडविले नाही तर त्यावरील राज्याचा हक्क जाणार असल्याचे समोर आले, अवघ्या ५ वर्षात ७ हजार कोटी शासन उपलब्ध करुन देवून प्रकल्प उभे राहणे आणि पाणी अडवून वापर सुरु करणे कठीण काम होते,

# पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे फोटो असलेले अनेक फ्लेक्स बोर्ड अज्ञाताने फाडले



**शिवजयंती निमित्त लावण्या.त आलेली फ्लेक्स बोर्ड अज्ञात इसमाने फाडले त्यानंतर प्रशासनाच्या वाहनातून ते एकत्र गोळा करण्यात आले**

**नारायणगाव** : किल्ले शिवनेरीच्या पायथ्यापासून तर किल्ले शिवनेरीच्या पहिल्या दरवाजा पर्यंत असणाऱ्या रस्त्याच्या कडेने उभे असणाऱ्या विजेच्या खांबांवर शिवसेना शिंदे गटाचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील व जुन्नर चे माजी आमदार शरद सोनवणे यांनी रस्त्याच्या कडेला असणाऱ्या अनेक विजेच्या खांबांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे . पी.नड्डा, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे फोटो असलेले अनेक फ्लेक्स बोर्ड लावले होते. मात्र हे अनेक बोर्ड अज्ञाताने फाडून टाकले. दरम्यान मध्यरात्री किंवा पहाटे हे फ्लेक्स बोर्ड फाडले असण्याची शक्यता पोलीस व्यक्त करीत असून फाडण्यात आलेली हे फ्लेक्स बोर्ड शासकीय वाहनात तात्काळ एकत्र करून गोळा करण्यात आले. याबाबत पोलीस प्रशासन काय कारवाई करते याकडे सर्व शिवप्रेमींचे लक्ष लागले आहे.

## महत्त्वाचे

### स्वाभिमानी लोकसभेच्या सहा जागा लढवणार

**शिवडे :** हातकणंगले लोकसभा मतदारसंघासह कोल्हापूर , सांगली, माढा, परभणी, बुलढाणा या लोकसभेच्या सहा जागा स्वाभिमानी शेतकरी संघटना स्वबळावर ... स्वाभिमानी लोकसभेच्या सहा जागा लढवणार, प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. जालिंदर पाटील यांनी दिली माहितीराशिवडे : हातकणंगले लोकसभा मतदारसंघासहकोल्हापूर, सांगली, माढा, परभणी, बुलढाणा या लोकसभेच्या सहा जागास्वाभिमानी शेतकरी संघटनास्वबळावर लढवणार असून प्रसंगी राज्यातील इतर जागांवर ही मतदारांसमोर सक्षम उमेदवार देण्याची तयारी आहे.

हातकणंगलेतून आमचे नेते माजी खासदार राजू शेट्टी, सांगलीतुन जिल्हाध्यक्ष महेश खराडे तर मी स्वतःकोल्हापूरलोकसभा मतदारसंघातून लोकसभेच्या रिंगणात उतरणार असल्याची माहीती स्वाभिमानीचे प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. जालिंदर पाटील यांनी दिली. ते ६३ व्या वाढदिवसानिमित्त येथे झालेल्या कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलत होते. यावेळी स्वाभिमानी पक्षाचे युवा जिल्हाध्यक्ष अजित पोवार, शेतकरी संघटना व पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी खासदार राजू शेट्टी यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी आयुष्य वेचले. शेतकरी संघटनेने शेतकरी, कष्टकऱ्यांच्या घामाला दाम मिळवून दिले. या शिदोरी वरच आम्ही निवडणुकीला सामोरे जात आहोत. लोकांना आता स्वाभिमानी पक्ष विश्वासाचा वाटू लागला आहे.

राज्यातील काँग्रेस, राष्ट्रवादी सह सर्वच पक्षातील राजकारण्यांवरील जनतेची विश्वास आर्हता संपत चाललेली आहे. राज्यातील इतर पक्षातील अनेक नेते स्वाभिमानीच्या संपर्कात असल्याने आम्हालाही ऊर्जा निर्माण झाली आहे. परिणामी राज्यातील सर्व लोकसभा मतदारसंघातून स्वाभिमानीचे उमेदवार उभा करण्याची तयारी केली आहे. यावेळी रंगराव पाटील, रावसाहेब डोंगळे, रमाकांत तोडकर आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# राज्याच्या गृह विभागाचे ऑडिट करा: सुप्रिया सुळे यांची मागणी



**मुंबई:** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्रालयाचा पदभार स्वीकारल्यापासून राज्यातील कायदा सुव्यवस्था स्थिती धोक्यात आल्याचा आरोप करून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी राज्याच्या गृह विभागाचे ऑडिट करण्याची मागणी केली आहे.

फडणवीस यांनी गृहमंत्रालयाची जबाबदारी स्वीकारल्यापासून राज्यातील कायदा सुव्यवस्था बिघडली आहे. याबाबत आपण फडणवीस यांच्या राजीनामाची मागणी केली की त्यावर टीका टिप्पणी केली जाते. चर्चा झडतात. मात्र, फडणवीस गृहमंत्री झाल्यापासून राज्यात गुन्हेगारी वाढली आहे. विशेषतः सत्ताधाऱ्यांचे प्राबल्य असलेल्या पुणे, ठाणे आणि नागपूर या महानगरातच गुन्हेगारी प्रचंड वाढली आहे, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली.

या संदर्भात आपण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची देखील भेट घेतली आहे. त्यांच्याशी झालेल्या चर्चेत आपण राज्यातील कायदा सुव्यवस्था स्थिती त्यांना कथन केली आहे. राज्याच्या गृह विभागाचे ऑडिट करण्याची मागणी आपण त्यांच्यापर्यंत ही पोहोचविली आहे, असेही सुळे यांनी स्पष्ट केले.

**आमच्यात काही टॅलेंट आहे म्हणून...**

**अजित पवार आणि अशोक चव्हाण यांच्यानंतर महाविकास आघाडीला, पर्यायाने राष्ट्रवादी काँग्रेसला आणखी काही मोठे धक्के बसणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते जयंत पाटील हे पक्ष त्याग करून भारतीय जनता पक्षाच्या वळचणीला जाणार असल्याची चर्चा आहे. याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, हल्ली अशा चर्चा रोजच कोणाच्यातरी नावाने झडत आहेत. भाजपकडे तब्बल १०० आमदार असूनही त्यांना आमच्या लोकांची आवश्यकता पडते आहे. याचा अर्थ आमच्याकडे काही विशेष टॅलेंट असणार आहे, अशा शब्दात त्यांनी भाजपची खिल्ली उडवली.**

# कोयनानगर येथे शासकीय क्रीडा संकुल व्हावे

## सह्याद्री सोशल फाउंडेशनची क्रिडा मंत्र्यांकडे मागणी

**पाटण** - कोयनानगर येथे सध्या छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण या जागेवर पाटण तालुक्यातील शासकीय क्रीडा संकुल उभारण्यात यावे अशी मागणी सह्याद्री सोशल फाउंडेशन कोयनानगर यांनी क्रिडा मंत्री ना.संजय बनसोडे यांच्याकडे केली आहे.

वाढती बेरोजगारी वाढती व्यसनाधीनता आणि तालुक्यामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध नसणे तसेच मोबाईलची वाढते व्यसन त्यातून येणारे नैराश्य आणि निर्माण होणारी गुन्हेगारी प्रवृत्ती पाहता तालुक्यातील आणि कोयना विभागामध्ये एक सुसज्ज असे क्रीडा संकुल असणे काळाची गरज आहे . यासाठी आवश्यक असणारे सुसज्ज असे क्रीडांगण पाटण तालुक्यामधील कोयनानगर येथे उपलब्ध आहे त्यामध्ये २०० मीटरचा स्टँडर्ड धावन मार्ग उपलब्ध आहे ,तसेच क्रीडा संकुलासाठी आवश्यक कार्यालय व कर्मचारी यांना राहण्यासाठी जवळच शासकीय निवासस्थाने उपलब्ध आहेत क्रीडांगणाच्या जवळच विजेची पाण्याची सोय उपलब्ध आहे तसेच कोयना नगर हे राज्य महामार्गावरचे महत्वाचे ठिकाण असून पर्यटन दृष्ट्या देखील विकसित होत असलेले पर्यटन स्थळ आहे दळणवळणाची आणि उपलब्ध जागेची उपलब्धता आणि आवश्यकतेनुसार सर्व गोष्टीचा समन्वय साधून कोयनानगर येथे शासकीय क्रीडा संकुल उभारावे अशी आमची मागणी आहे कोयना नगर येथे सुसज्ज जागेत क्रीडा संकुल उभे

**स्थानिक लोकप्रतिनिधीं आमदार हे तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष असतात त्यामुळे त्यांनी पाटण तालुक्यातील क्रीडा संकुल कोयनानगर येथे करण्यासाठी पुढाकार घ्यावा विभागातील तरुणांमध्ये स्पर्धा च्या युगात आपल्या तालुक्यातील मुलं मुली मागे राहून चालणार नाही याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन शासकीय क्रीडा संकुल कोयनानगर येथे व्हावे यासाठी पुढाकार घेऊन कोयना विभागातील धरणग्रस्त, भूकंपग्रस्त, अभयारण्य ग्रस्त स्थानिकांना काही अंशी न्याय द्यावा .**

राहिले तर येथे वेगवेगळ्या स्पर्धांचे नियोजन, शासकीय प्रशिक्षण केंद्र, अगदी राज्य पातळीवरच्या स्पर्धा देखील यशस्वीपणे राबवल्या जाऊ शकतात. एकीकडे कोयना धरण, कोयना अभयारण्य ,भूकंपप्रवण क्षेत्र ,दरडग्रस्त क्षेत्र ,इको सेन्सिटिव्ह झोन ,पश्चिम घाट अशा वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे येथे कोणतेच प्रकल्प किंवा उद्योग उभारू शकत नाहीत त्यामुळे दिवसेंदिवस येथील सामान्य जनता शहराच्या दिशेने रोजी रोटी साठी मार्गक्रमण करत आहेत आणि त्यामुळे कोयना विभाग भकास होत चालला आहे. किमान अशा शासकीय प्रकल्पामुळे येथील तरुणांना एक योग्य अशी दिशा मिळू शकते आणि तरुण पिढी भविष्यात योग्य मार्गाने आपले आयुष्य जगू शकतात . त्यामुळे पाटण

# सामुदायिक विवाह सोहळा संपुष्टाच्या मार्गावर सामूहिक विवाह सोहळ्याला गती देण्यासाठी सामाजिक पुढाकाराची गरज

**रांजणी :** गेली तीस - पस्तीस वर्षांपूर्वी उत्तर पुणे जिल्ह्यातील विशेषतः आंबेगांव , जुन्नर तालुक्यात सुरू झालेली सामुदायिक विवाह सोहळा चळवळ गेल्या दोन-तीन वर्षापासून संपुष्टाच्या मार्गावर आहे . खरे तर सामुदायिक विवाह सोहळा पार पडत असताना या विवाह सोहळ्यात गोरगरीब वधू-वर यांचे विवाह सोहळे पार पडत होते . मात्र आता मंगल कार्यालयांचे फॅड आल्याने सामुदायिक विवाह सोहळा संपुष्टाच्या मार्गावर असल्याचे विदारक चित्र पाहायला मिळत आहे.

दरम्यान सामुदायिक विवाह सोहळे पुन्हा सुरू होण्यासाठी सामाजिक संस्थांनी , त्याचबरोबर समाजातील सर्व घटकांनी एकत्र येण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे .साधारणतः १९८९ -९० साली सामुदायिक विवाह सोहळा चळवळीला तत्कालीन मांजरवाडी येथील प्रगतशील शेतकरी बाबाजी नेहरकर यांनी खऱ्या अर्थाने चालना दिली .जुन्नर तालुक्यात बाबाजी नेहरकर यांच्या पुढाकाराने सामुदायिक विवाह सोहळा सुरू झाला . हळूहळू जुन्नर तालुक्यातील सामुदायिक विवाह सोहळ्यांच्या धरतीवर आंबेगाव तालुक्यातील अनेक गावांनी सामुदायिक विवाह सोहळ्याचा जोर धरला . उत्तर पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सामुदायिक विवाह सोहळे पार पडत होते .मात्र गेल्या दोन-तीन वर्षात मंगल कार्यालयांच्या फॅडमुळे सामुदायिक विवाह सोहळा चळवळ जवळजवळ संपुष्टात आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे .

एकेकाळी समुदायिक विवाह सोहळा हा समाजातील गोरगरीब लोकांसाठी अत्यंत उपयुक्त असा उपक्रम होता . सामुदायिक विवाह सोहळ्यामध्ये पैसा , वेळेची बचत त्याचबरोबर वारेमाप खर्चाची बचत होत होती . अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात समुदायिक विवाह सोहळा करण्याबाबत चढाओढ आणि स्पर्धा पाहायला मिळायची .बहुतेक गावांमध्ये सामुदायिक विवाह सोहळा समित्या , संस्था या निमित्ताने कार्यरत होत्या . परंतु आता या संस्था समित्या कालबाह्य झाल्याचे पाहायला मिळत आहे . ग्रामीण भागात अनेक राजकीय नेते त्यांच्या वाढदिवसानिमित्त सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करत होते मात्र ते चित्रही आता पाहायला मिळत नाही .

# कुरुंदवाड येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

कुरुंदवाड : पारंपारिक राजेशाही वेशभूषेत कुरुंदवाड शहरातील शेकडो मावळ्यांनी आणि युवतीसह रणरागिनीने छत्रपती शिवरायांच्या जन्मोत्सव पाळण्याला घेऊन येतील शिवतीर्थ असलेल्या छत्रपती शिवरायांच्या पायाला दुधाचा अभिषेक करून शिवरायांच्या जयघोषात अत्यंत आनंद उत्सवात शिवजयंती साजरी केली




कुरुंदवाड येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करताना शिवभक्त.

दरम्यान नगरपरिषद,मराठा समाज मंडळ,विद्यालय, महाविद्यालय व सामाजिक मंडळासह परिसरात रॅली सह अदि विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले.

येथील पालिका सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला प्रशासक तथा मुख्याधिकारी आशिष चौहान यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पाणीपुरवठा अभियंता प्रदीप बोरगे कार्यालय निरीक्षक पूजा पाटील, योगेश गुरव,नंदकुमार चौधरी,शशिकांत कडाळे,विनायक दळवी, अमोल कांबळे,अभिजीत कांबळे,रिजवान मतवाल आदी उपस्थित होते.

येथील मराठा मंडळ कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला प्रतिमेला रामदास मधाळे, ममतेश आवळे,अजित देसाई,रामचंद्र मोहिते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी महिपती बाबर,नंदकुमार पाटील,कृष्णा नरके,आनंदा शिंदे अदि उपस्थित होते.

येथील सीताबाई पटवर्धन हायस्कूल,दत्त महाविद्यालय,जिल्हा परिषद शाळा,सैनिकी पॅटर्न निवासी शाळा तर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहरातून रॅली काढणयात आली होती. रॅलीत छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ यांचे वेशांतर करून विद्यार्थी सहभागी झाले होते. रॅलीत संस्थेची चेअरमन प्रा शरदचंद्र पराडकर,मुख्याध्यापकसह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

शिवहिंद मंडळातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला शिवसेना जिल्हाप्रमुख वैभव उगळे,दयानंद मालवेकर,सुनील कुरुंदवाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी मिलिंद गोरे,पिंटू खराडे,हिंदुराव खराडे,प्रा.डी.वाय. चव्हाण आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# खंडोबा देवाचा भंडारा उधळून महाराजांना अभिवादन

**जेजुरी :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९४ व्या जयंती निमित्त सोमवारी महाराष्ट्राचे कुलदैवत जेजुरी खंडोबा गडावरील ऐतिहासिक आशा छत्रपती शहाजी शिवाजी राजे पितापुत्र भेटीच्या शिल्प प्रतिकृतीवर खंडोबा देवाचा भंडारा उधळून महाराजांना अभिवादन करण्यात आले.

देवसंस्थान विश्वस्त ॲड पांडुरंग थोरवे आणि या प्रतिकृतीचे शिल्पकार महेंद्र थोपटें, अनिकेत देशमुख यांच्या हस्ते स्वराज्य संकल्पक शहाजी महाराज आणि स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिल्पाला हरिद्रचूर्ण अभिषेक करीत अभिवादन करण्यात आले.

यावेळी देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष पोपट खोमणे, विश्वस्त मंगेश घोणे, अनिल सौन्दडे, जेजुरी शिवसेनेचे विठ्ठल सोनवणे, ॲड विश्वास पानसे देवस्थानाचे व्यवस्थापक राजेंद्र जगताप, माजी विश्वस्त संदीप जगताप, सतीश गाडगे आदी मान्यवर उपस्तिथ होते.

**शिवराय व शहाजी महाराज यांच्या भेटीचे ऐतिहासिक ठिकाण**

इ स १६६२ साली छत्रपती शिवाजी महाराज आणि शहाजी महाराज यांची पितापुत्र भेट भोसले घरण्याची कुलदैवत असलेल्या खंडोबा गडावर झाल्याचा इतिहास सांगितला जातो. काही वर्षांपूर्वीच सदर ऐतिहासिक घटनेची शिल्पकृती साकरण्यात आली असून दरवर्षी शिवजयंतीला अभिवादन केले जात असते. या जयंती निमित्त भाविकांना जिलेबी वाटप करण्यात आले

# नागालँडमध्येही अजित पवार यांचीच सरशी

**नवी दिल्ली:** महाराष्ट्र पाठोपाठ नागालँड मध्येही विधानसभा अध्यक्षांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार यांच्याच पाठीशी असल्याची ग्वाही देत शरद पवार गटाला धक्का दिला आहे. अजित पवार यांना पाठिंबा देणाऱ्या आमदारांना अपात्र घोषित करण्याची मागणी करणारी शरद पवार गटाची याचिका नागालँडच्या विधानसभा अध्यक्षांनी फेटाळून लावली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवार यांनी शरद पवार यांच्या नेतृत्वाविरोधात बंडाचा झेंडा उभारल्यानंतर नागालँडमधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या सात आमदारांनी अजित पवार यांना आपला पाठिंबा घोषित केला.

त्यानंतर शरद पवार गटाचे राष्ट्रीय महासचिव हेमंत टकले यांनी या आमदारांना अपात्र ठरवण्याबाबत याचिका नागालँडच्या विधानसभेचे अध्यक्ष शेरिंगेन लोंगकुमे यांच्याकडे दाखल केली. त्यावर केंद्रीय निवडणूक आयोगाचा निर्णय येईपर्यंत याप्रकरणी निकाल देऊ नये अशी विनंती अजित पवार गटाच्या वतीने विधानसभा अध्यक्षांना करण्यात आली.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस मधील फुटीसंदर्भात निवडणूक आयोगाने निकाल देताना राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष आणि त्याचे निवडणूक चिन्ह घड्याळ हे अजित पवार यांना बहाल केले. याच निर्णयाचा आधार घेऊन नागालँडच्या विधानसभा अध्यक्षांनी देखील राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष अजित पवार यांच्या पाठीशी असल्याचा निर्वाळा दिला. अध्यक्षांच्या या निर्णयामुळे शरद पवार गटाला दुसरा मोठा धक्का बसला आहे.

# हडपसर भागात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



**हडपसर** : हडपसर विधानसभा शिवसेना मतदारसंघ शिवसेना शाखेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ नवी जयंती साजरी करण्यात आली .

हडपसर विधानसभा मतदार संघ शिवसेना समन्वयक संजय सपकाळ यांनी त्यांच्या संपर्क कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या महाराजांचे गुणगान करण्यात आले यावेळी हडपसर विधानसभा संघटक संजय सपकाळ, चंद्रकांत सातव, प्राध्यापक राजेंद्र शिखरे ,भालकेसर ,तात्या सोनवणे ,शाखा संघटक बाळा राजगे, सुरेश दोरी, अक्षय पोटे, कुणाल सपकाळ, इत्यादी उपस्थित होते.

# छत्रपती शिवरायांची सातारा राष्ट्रवादी काँग्रेस भवनमध्ये जयंती साजरी

## ढासळलेल्या कालव्याचे काम स्वतःच्या घरात देवूनच जनतेच्या पाठीत खंजीर खुपसला

**सातारा :** छत्रपती शिवाजी महाराज ही व्यक्ती नसून विचार आहेत. सर्वधर्मसमभावाची शिकवण देणारे छत्रपती शिवाजी महाराज आहेत. त्यांनी स्वराज्याची स्थापना करण्यासाठी एका जातीची नव्हे तर सर्व जाती धर्मातील मावळ्यांना एकत्र करून ऐतिहासिक क्रांती केली. त्यांच्या जयंतीनिमित्त आज सातारा येथील राष्ट्रवादी काँग्रेस भवन मध्ये त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. या वेळेला छत्रपती शिवाजी महाराज की जय या जयघोषाने परिसर दणाणून सोडण्यात आला.



**साताऱ्यातील राष्ट्रवादी काँग्रेस भवन मध्ये छत्रपती शिवरायांना अभिवादन करताना मान्यवर (छाया- निनाद जगताप, सातारा)**

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा वारसा तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार साहेबांनी केली होती. आजही त्या विचाराची बांधिलकी जपण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक लढाई जिंकल्या. या लढाईमध्ये गनिमी कावा व शूरवीरांच्या जीवावर त्यांनी रयतेचे रक्षण केले. आजच्या घडीला त्यांचा आदर्श घेणारीच व्यक्ती भविष्यात सामाजिक कार्यात पुढाकार घेतील. अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील माने व इतर मागासवर्गीय जिल्हा सेलचे जिल्हाध्यक्ष विजय बोबडे, युवक अध्यक्ष मकरंद बोडके व जिल्हा सरचिटणीस राजकुमार पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला सातारा राष्ट्रवादी काँग्रेस भवन मुख्यालयात सातारा जिल्ह्यातील निष्ठावंत व प्रामाणिक राष्ट्रवादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सुनील माने, सरचिटणीस राजकुमार पाटील, युवक अध्यक्ष मकरंद बोडके, विद्यार्थी काँग्रेस अध्यक्ष सचिन जाधव, मागासवर्गीय सेल अध्यक्ष विजय बोबडे, शिक्षक सेलची जिल्हाध्यक्ष उमेश देशमुख, असंघटित कामगार सेलचे जिल्हाध्यक्ष संतोष ननावरे, वाहतूक सेलचे जिल्हाध्यक्ष संजय पिसाळ, प्राध्यापक विकास पवार , स्वप्निल वाघमारे इत्यादी पदाधिकारी ही उपस्थित होते.



# शिवजयंतीनिमित्त आझम कॅम्पस ते लाल महाल मार्गावर अभिवादन मिरवणुक

**पुणे :** 'महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटी'च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांच्या भव्य अभिवादन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. सोमवार, दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी साडे आठ वाजता संस्थेचे अध्यक्ष तसेच डॉ पी ए इनामदार युनिव्हर्सिटी चे कुलपती डॉ. पी.ए.इनामदार यांच्या हस्ते मिरवणुकीस प्रारंभ झाला. संस्थेचे सचिव प्रा. इरफान शेख, एस. ए. इनामदार, मशकुर शेख, साबीर शेख, अफझल खान, अब्दुल वहाब, शाहिद शेख, बबलू सय्यद, आसिफ शेख, डॉ. गुलजार शेख, सिकंदर पटेल,विश्वस्त, पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक , विदयार्थी सहभागी झाले. पुण्यातील अल्पसंख्य, बहुजन समाजातील विद्यार्थी यांचा सहभाग असलेली ही सर्वात मोठी शिवजयंतीदिनाची अभिवादन मिरवणूक ठरली ! एकूण ९ हजार विद्यार्थी या मिरवणुकीत सहभागी झाले, मिरवणुकीचे हे २३ वे वर्ष होते.

आझम कॅम्पस ते लाल महाल असा या मिरवणुकीचा मार्ग होता. पूना कॉलेज, गोल्डन ज्युबिली टेक्नीकल इन्स्टिट्युट, जूना मोटर स्टँड, पद्मजी पोलिस चौकी, क्वार्टर गेट, संत नरपतगीरी चौक, नाना चावडी चौक, अरुणा चौक, अल्पना टॉकीज, डुल्या मारूती चौक, तांबोळी मशीद, सोन्या मारुती चौक, मोती चौक, फडके चौक मार्गे लाल महाल येथे मिरवणुकीची सांगता झाली. ठिकठिकाणी स्वागत झाले.मिरवणूकीत शैक्षणिक संस्थांचे सर्व प्राचार्य, पदाधिकारी, कर्मचारी, दरबार ब्रास बॅण्डची दोन पथके, ढोल-ताशांचे पथक, तुतारी, नगारे देखील सहभागी झाले.दरवर्षी संस्थेतर्फे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महंमद पैगंबर यांच्या जयंतीदिनी त्यांना अभिवादन करण्यासाठी भव्य मिरवणुका काढल्या जातात.